'Research Journey' International Multidisciplinary E- Research Journal
Special Issue I– Emerging Trends & Issues in Research & Development
Global Impact Factor – 0.565 (2014) & 0.676 (2015)
ISSN : 2348-7143 (Online)
Jan-March- 2016

# देशीवाद

**प्रा. डॉ. शिरीष पाटील**
**अधिष्ठाता, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**
**कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय,**
**जामनेर, जि. जळगाव.**

मराठी साहित्यामध्ये सर्वसाधारणपणे १९६० नंतर साहित्य-विकेंद्रीकरणाची प्रक्रिया फार वेगाने सुरु झाली. वेगवेगळे साहित्यप्रवाह आपल्या ठोस विचारधारेसह स्थिराऊ लागलेत. त्याचबरोबर वेगवेगळ्या प्रकारचे वादही नव्याने अभ्यासले जाऊ लागलेत. मानवी जीवनाच्या अनेक पैलूंना हे साहित्यप्रवाह, वाद संकल्पना आपल्या कवेत घेऊ लागलेत व नव्या नव्या विचारधारा समाजापुढे आणू लागलेत. मानवी जीवनात माणसाच्या स्वभावाच्या अनेक पैलूंचा शोध घेण्याचा प्रयत्न साहित्य करत असते. प्रत्येक काळात हा शोध घेण्याचा प्रयत्न सुरु राहिलेला आहे. काही वेळा विचारधारांचा टकराव होतो. तर काही वेळा मतभेद होऊन अमकेच एक श्रेष्ठ तमके कनिष्ठ अशा साहित्यिक चर्चा होत असतात. वास्तविक साहित्यात जेव्हा एखादी संकल्पना रूढ होऊ पाहते. जुने स्वरुप बदलून नवे रूप धारण करते त्यावेळी मनातल्या काही विशिष्ट जाणीवांचे एकत्रीकरण होते व त्यातून एक नवा विचार चिंतनाच्या पातळीवर येत असतो. लेखक कवी हा विचार आपल्या साहित्य-कलाकृतीतून शब्दबध्द करत असतात. १९६० नंतर आलेल्या नव-विचारांच्या पिढीने परिस्थितीशी दोन हात करतांना प्रतिकूल परिस्थितीत चांगल्या साहित्यनिर्मितीचे प्रयत्न केलेत. ग्रामीण, अर्धनागरी, वाड्या-वस्त्यांमधून आलेली तरुण संवेदनशील पिढी जे काही अकृत्रिम लिहू लागली ते समाजाला रूचू लागले, आपलेपण जाणवू लागले. अरे हे तर आपलेच जीवनदर्शन आहे ही भावना वेगाने वाढू लागली. आणि ग्रामीण, शेती व्याप्त परिसरातील साहित्य चित्रण हे अस्सल मातीतले साहित्य आहे असे आतून वाचकांना वाटू लागले. त्यातूनच देशीवादाची साहित्य सिद्धांतांच्या दृष्टीने तपासणी होऊ लागली.

'देशीवाद' म्हणजे नेमके काय? असा प्रश्न पडतो. 'देशी' म्हणजे नेमके काय? त्याचा अर्थ लावतांना त्या त्या परिसरातील अस्सल ग्रामीण भागातील जगणे, वाड्या-वस्त्यांवरील लोकांचे जगणे, बोलणे, लिहिणे, खाद्यसंस्कृती म्हणजे हे सर्व देशी का? अ-नागर संस्कृतीचे हे लोक बोलत असलेली भाषा जी प्रमाणभाषा नाही ती भाषा म्हणजे बोलीभाषा. ती देशीभाषा काय? प्रमाणभाषेच्या आधी किंवा आदिम काळापासून बोलल्या जाणाऱ्या भाषा म्हणजे खऱ्या बोलीभाषा ज्या आजही अस्तित्वात आहे. त्याचा देशीवादाशी काही संबंध आहे का? असे काही प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होतात. म्हणून देशीवादाची संकल्पना आधी समजून घेणे महत्वाचे आहे. 'नेटिविझम' या इंग्रजी शब्दाला पर्यायी शब्द म्हणून देशीयता किंवा देशीवाद हा शब्द रूढ झालेला आहे. याचा सखोल विचार केला असता असे म्हणता येईल की, देशीवाद म्हणजे त्या त्या भूमीशी घट्टपणे जोडून राहणे, चिकटून राहणे, आपली स्वतःची एक खास जीवनशैली, जगण्याची पद्धत विकसित करणे असे त्याचे ढोबळमानाने स्वरुप राहिलेले आहे. १९८० च्या आसपास विख्यात लेखक भालचंद्र नेमाडे यांनी देशीवादाची मांडणी नव्याने केली व मराठी साहित्यात देशीवादाची चर्चा सुरु झाली. आपला देश बहुसांस्कृतीक आहे व अनेकभाषा, पंथ यांची रेलचेल आहे. बाहेरून आलेल्या अनेक गोष्टी, आक्रमणे, युद्ध,

असूनही हा देश कधी भाषिक, सांस्कृतिकदृष्ट्या नष्ट झाला नाही याला अनेक कारणे असू शकतात. पण सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे स्वतःच्या अस्तित्वासाठी इथल्या मानवी समाजाने देशीयतेची पाळेमुळे घट्ट रोवलेली आहेत. त्यामुळे इथली देशी संस्कृती टिकून राहिली. महानुभवांचे अस्सल साहित्य, संताच्या रचना आणि पोवाडे हे या मातीतले साहित्य चिरंतर राहिले. देशीयतेच्या खुणा जतन करुन त्यात काळानुरुप बदल झालेत. मात्र देशीभाषांना जाणीवपूर्वक अनुल्लेखाने मारण्याचा त्यांना तुच्छ समजण्याचा प्रयत्न येथेच झालेला आहे. त्यामुळे देशीवादाचे स्वरुप गंभीरपणे समजून घ्यावे लागेल.

देशीवादाच्या मूळ स्वरुपाचे विश्लेषण करतांना प्रा. भालचंद्र नेमाडे यांचे मत विचारात घेणे गरजेचे आहे. त्यांच्या मते भारतीय इतिहासात एखाद्या वंशाच्या लोकांना जन्मानेच दास ठरवून किंवा अस्पृश्यतेचा अदृश्य तुरुंग उभारुन गुलामीचे जीणे लादले गेले. त्याचे कारण परसंस्कृतीने इथल्या मूळच्या संस्कृतीवर केलेल्या जुलमाचे फलित आहे. जगभरात काही समान तत्त्वे सापडतात. पण ती समानता त्या त्या देशी वैशिष्ट्यांसह अस्तित्वात आलेली नसते. आणि हे देशी वैशिष्ट्ये गृहित धरल्याशिवाय दोन भिन्न संस्कृतीच्या किंवा दोन भिन्न भाषांच्या साहित्यकृतीची तुलना करता येत नाही. नेमाडे परकीय प्रभाव आत्मसात करण्याच्या प्रक्रियेत देशीकरण असे म्हणतात. परंतु ही प्रक्रिया सक्षम असली पाहिजे. आपली स्वतःची प्रमाणेच टिकवून ठेवता आली पाहिजेत. आंग्ल संस्कृतीच्या संपर्कामुळे आपल्या देशी सौंदर्यशास्त्रीय व्यवस्था भ्रष्ट झाल्यात किंवा केल्या गेल्या. त्यामुळे आपल्या साहित्याबद्दलच्या संकल्पनाही विकृत झाल्या. पाश्चात्य साहित्य संकल्पना व तंत्रे आपल्या सामाजिकतेच्या संदर्भात अप्रस्तुत असूनही मराठी साहित्यात त्यांचे स्त्रोत माजले असे नेमाडे यांना वाटते.' नेमाडे सरांच्या मताचा गांभीर्याने विचार केला तर देशीवादाची संकल्पना समजून घ्यायला मदत होते. आपली प्रमाणके आपण जोपासलीच पाहिजे याबाबत दुमत असण्याचे कारण नाही. आपल्या देशीय संस्कृतीत विविध जाती, धर्म, पंथ यांच्या जाणिवांचे विविध प्रवाह, सामाजिक प्रतिष्ठेच्या बहुरंगी उतरंडी, नाना प्रवृत्तीचे स्वभाव असलेली माणसे यामुळे सर्वांची देशी प्रमाणके टिकवून ठेवतांना मोठी दमछाक होते. सर्वांना एका धाग्यामध्ये बांधताना बौद्धि क कसरती कराव्या लागतात. जुन्या लोकांच्या वागण्या बोलण्यातून देशीयतेची, देशीवादाची एक वेगळी संकल्पना रूढ झालेली आहे. ती म्हणजे आपल्या देशातील जुनी समाजव्यवस्था व तिला अभिप्रेत असलेली मूल्ये म्हणजे देशीयता. आता सर्वच जुन्या बाबींचे जतन करणे, सांभाळणे हे आधुनिक काळात कठिण होऊ लागले आहे. त्यामुळे देशीवाद व आधुनिकता यांचा समन्वय साधणे हे खरे कौशल्याचे कार्य आहे. मराठी साहित्यातून ते कितपत होत आहे हे पाहणे गरजेचे आहे. साहित्यातल्या देशीवादात प्रामुख्याने काही प्रवृत्ती डोकावतात त्यामध्ये भूतकाळातल्या काही रूढी, परंपरा यांचा समर्थन करुन त्यांचे पुनर्रुजीवन करणारा देशीवाद. त्याचबरोबर इहवादाच्या व विवेकाच्या अंगाने जाणारा देशीवाद तपासला गेला पाहिजे. देशीवादात भाषा, समाज, संस्कृती हे घटक महत्त्वाचे ठरतात. यामध्ये बारा बलुतेदारांची, बहुजनांची बोलीभाषा ही देशीवादाला समर्थनीय असते. तर उच्चवर्णिय अभिजनांची भाषा ही वेगळ्या स्वरुपाची असते. त्यामुळे देशी संस्कृतीची पाळंमुळं शोधताना या बाबीचा विचार करणे आपणास क्रमप्राप्त आहे. प्रत्येक समूहाला आपली संस्कृती, आपला समूह, आपला परिसर व आपली भाषा ही सातत्याने जपाविशी वाटते. यामध्ये ही माणसे रममाण होतात त्यामुळे आपोआपच त्या प्रदेशाशी त्या समूहाचे देशीवादाच्या अंगाने जाणारी वैशिष्ट्ये महत्वपूर्ण ठरतात.

देशीवादाच्या संदर्भात विचार करताना संस्कृती हा एक महत्त्वपूर्ण घटक आपल्याला विचारात घ्यावा लागतो. संस्कृतीमध्ये श्रद्धा, रिती, संकेत, सवयी, मूल्यव्यवस्था हे सारे काही असते. त्याचा प्रभाव समाजजीवनावर निश्चितपणे पडत असतो. परकीय संस्कृती व आपली भारतीय संस्कृती निश्चितच वेगवेगळ्या आहेत. आधुनिक काळात परकीय संस्कृतीचा प्रभाव बहुतांश क्षेत्रात आपल्यावर पडत असल्याने मोठ्या प्रमाणावर देशीवादाला वेगवेगळी पुटं चढलेली आहे. त्यामुळे या सगळ्या बाबींचा गांभिर्याने विचार करुन देशीवाद समजून घेतला पाहिजे. जागतिकीकरणात आज एकविसाव्या शतकात सर्व जग प्रगतीच्या दिशेने घोडदौड करत आहे. काही प्रश्न नव्याने निर्माण होत आहेत भाषा, संस्कृती यांचेही प्रश्न उद्‌भवत आहेत. मात्र हे सगळे असताना एकाच विचारधारेशी बांधून राहणे या काळात परवडणारे नाही. आधुनिक काळातले साधनांचे सर्व फायदे घ्यायचेत. अत्याधुनिक यंत्रणांचा वापर करायचा आणि देशीवादाची वेगळ्याच पद्धतीने पाठराखण करुन काही काळाच्या ओघात न टिकणाऱ्या गोष्टींचे जतन करायचे, समर्थन करायचे हा प्रकार नीट समजून घेतला पाहिजे. यामुळे काही जुन्या गोष्टींचे पुनर्रुजीवन होऊन आधुनिकतेला विरोध होण्याची शक्यता निर्माण होते आणि ते माणसांच्या प्रगतीला घातक आहे. स्वदेशी, देशी, स्वपरंपरा या एका चौकटीमध्ये निश्चित चांगल्या असतात. मात्र जर आपण त्यांना धार्मिक, वर्चस्ववादी स्वरुप दिले तर मात्र समाजजीवनामध्ये मोठी दरी निर्माण होऊ शकते. म्हणून देशीवादाचा अभ्यास करताना किंवा ती संकल्पना समजून घेताना साहित्यिकांना विवेकशील पद्धतीने लिखाण करावे लागेल. देशीय परंपरा जर आम्हाला दैववादी, निराशवादी, नियतीवादी, पुनर्रुजीवनवादी, अंधश्रद्धाळू बनवत असतील त्या दिशेने नेत असतील तर त्या प्रगतीला बाधक ठरणाऱ्या बाबी आम्ही सोडल्या पाहिजेत. कारण आधुनिक काळात जग जवळ आलेले असताना हे सर्व प्रकार माणसांच्या प्रगतीला बाधक आहेत. म्हणून अधिकाधिक विज्ञानवादी दृष्टीकोन जर आम्ही देशीवादात आणला तर आमची प्रगती निश्चितपणे चांगली होईल व समाजजीवन पण निकोप राहिल या दिशेने लिखाण होणे फार गरजेचे आहे. परंपरा आणि नवता यांचा परस्पर संबंध देशीवादात फार खुबीने व डोळसपणे प्रस्तापित करावा लागेल. आमच्या पूर्वजांची जी चांगली स्विकारण्यासारखी मूल्यव्यवस्था आहे त्याला आम्ही निश्चित पुढे नेले पाहिजे. मात्र जर त्यात काही घातक बाबी असतील तर त्या सोडल्या पाहिजेत. मराठी साहित्यामध्ये भालचंद्र नेमाडे, साने गुरुजी यांच्या कादंबऱ्यांमधून देशीवादाची चांगली मांडणी केलेली आहे. त्यातला काही भाग आपल्याला स्विकारावासा जरी वाटला नाही तरीसुद्धा आपण या कादंबऱ्यांना वेगळ्या प्रकारची दाद देतो. साहित्यातील सांस्कृतिक भान जेव्हा अस्पष्ट होत जाते तेव्हा जाणिवपूर्वक देशीवादाची मदत घेणे निश्चित उपयुक्त आहे.

भारतीय किंवा मराठी साहित्यात गौतम बुद्धांची वचने, चार्वाक, संत तुकाराम, संत कबीर, महात्मा ज्योतीराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या साहित्यातून, प्रबोधनातून अस्सल प्रकारच्या देशी जाणिवा प्रकट झालेल्या आहेत. त्यामुळे आपल्याला देशीवादाला जर चांगले स्वरुप द्यायचे असेल तर याच मार्गावरुन जावे लागेल. मानवी जीवनाला लागलेली कुरुपता, द्वेषभावनेचे ग्रहण, स्वार्थीपणा जर पूर्णपणे संपवायचा असेल व येणाऱ्या पिढ्यांना चांगले काही द्यायचे असेल तर देशीवादातल्या चांगल्या बाबी जतन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. ही जबाबदारी पार पाडतांना कुणाचा द्वेष न करता साहित्य व्यवहाराची एकांगी मांडणी न करता देशीवादाला अधिक निरोगी, सुंदर, संपन्न, आपलेसे करण्याची जबाबदारी सर्वांची आहे. जगातले प्रत्येक देश आधुनिकता स्वीकारुन आपली देशीयता सुद्धा टिकवून ठेवतात. त्यामुळे साहित्यिकांवर ही फार मोठी जबाबदारी आहे की, त्यांनी आधुनिक काळातल्या प्रगतीसोबत देशीवादाची डोळसपणे पाठराखण करणे व लोकांना एका नव्या युगात घेऊन जाणे. चांगल्या

ISSN : 2348-7143 (Online)
Jan-March- 2016

साहित्यकृतींच्या माध्यमातून, परखडसमीक्षेच्या माध्यमातून आपण वाचकांची संवेदनशीलता, रसिकता, आकलनक्षमता लक्षात घेऊन सर्वोत्तम कलाकृती त्यांच्यापुढे आणणे व येणाऱ्या पिढ्यांसाठी देशीवादाची एक नवी पायवाट तयार करुन देणे महत्त्वाचे ठरेल. जी पायवाट विज्ञानाच्या व चांगल्या संस्कारांच्या माध्यमातून मानवतावादाकडे सर्वांना नेईल यासाठी अथक प्रवास, चिंतन, मनन व साहित्यनिर्मिती आवश्यक आहे. मगच भारतीय साहित्यात देशीवादाची एक नवी संकल्पना रुजण्यास मदत होईल.

**संदर्भ :**

१. टीकास्वंयवर - डॉ. भालचंद्र नेमाडे, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.
२. समाज साहित्य समीक्षा - डॉ. यशवंत मनोहर,सुगावा प्रकाशन, पुणे.
३. समीक्षेतील नव्या संकल्पना - मनोहर जाधव, स्वरुप प्रकाशन, पुणे.